संक्षिप्त

बॅडमिंटन : पुण्याच्या शरयू रांजणेची चमक

पुणे : राजस्थान येथे पार पडलेल्या कनिष्ठ गटाच्या योनेक्स सनराईज अखिल भारतीय मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत अण्णासाहेब नातू चॅम्पियन प्रोग्रामचा (एएनसीपी) भाग असलेल्या पुण्याच्या शरयू रांजणेने मिश्र दुहेरीत सुवर्ण, दुहेरीत रौप्य आणि एकेरीत कांस्यपदकाची कमाई केली. सोयरा शेलार मुलींच्या दुहेरीत रौप्यपदकाची मानकरी ठरली. मिश्र दुहेरीत शरयूने हेमंत श्री समितलाच्या साथीत रोहन पाबीशेट्टी आणि धृती बंदा जोडीचा २१-१४, १५-२१, २१-१४ असा पराभव केला. मुलींच्या दुहेरीत अंतिम सामन्यात शरयू आणि सोयरा यांना अनुष्का ईपटे आणि ऋतिका कांबळे यांच्याकडून २२-२०, १८-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. स्पर्धेतील १५ वर्षांखालील एकेरीत उपांत्य फेरीत शरयूला हमसिनी चंद्रामकडून १८-२१, १६-२१ असे पराभूत व्हावे लागले.

क्रिकेट : मेव्हिरिक्सचा चुरशीचा विजय

पुणे : मेव्हिरिक्स अकादमी संघाने इकोल करंडक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत चुरशीच्या लढतीत अष्टपैलू स्पोर्ट्स संघावर अवघ्या दोन धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मेव्हिरिक्स अकादमी संघाने निर्धारित २० षटकांत ८ बाद १९९ धावा केल्या. शुभम तैस्वालने ५०, तर संदीप शिंदेने ४४ धावांची खेळी केली. आव्हानाचा पाठलाग करताना अष्टपैलू संघाचा डाव २० षटकांत ५ बाद १९७ धावांवर मर्यादित राहिला. अष्टपैलूच्या सागर पवार (७३) आणि अमित राठोड (४७) यांचे प्रयत्न अपुरे पडले. अक्षय वैकर आणि संज्योत सुतार यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

टेबल टेनिस : कसबेकर, कोठावळे विजेते

पुणे : पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित डॉ. प्रमोद मुळे स्मृती करंडक प्रौढ राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष गटात केदार कसबेकर, अमित श्रॉफ, अजय कोठावळे, प्रकाश पंजाबी यांनी विजेतेपद मिळवले. ३९ वर्षांवरील पुरूष गटात अंतिम फेरीत मुंबई शहरच्या केदार कसबेकर यांनी सुहास राणे यांचा ६-११, १०-१२, ११-८, ११-८, तर ४९ वर्षांवरील गटात अमित श्रॉफ यांनी अग्रमानांकित प्रसाद नाईक यांचा ९-११, ११-८, १२-१०, ११-८ असा पराभव केला. अजय कोठावळे यांनी ५९ वर्षांखालील गटात कपिल कुमार यांना १३-११, ११-९, ११-९ असे नमवले.

नेट्समध्ये फलंदाजीचा सराव; रोहित पहिल्या कसोटीला मुकण्याची चिन्हे

राहुलबाबतची चिंता दूर!

पीटीआय, पर्थ

भारताचा अनुभवी फलंदाज केएल राहुलच्या कोपराला झालेली दुखापत गंभीर नसल्याचे स्पष्ट झाले असून २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात तो खेळणार हे जवळपास निश्चित झाले आहे. राहुलने रविवारी नेट्समध्ये सराव केला. फलंदाजी करताना त्याला कोणतीही अडचण जाणवली नाही. त्यामुळे राहुलच्या तंदुरुस्तीबाबतची चिंता आता दूर झाली आहे. त्याच वेळी भारताचा कर्णधार रोहित शर्मा पहिल्या कसोटीला मुकण्याची चिन्हे असून जसप्रीत बुमराला कर्णधारपद भूषविण्याची संधी मिळेल.

बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिकेच्या दृष्टीने भारतीय संघ पर्थच्या 'वॅका' स्टेडियममध्ये भारत 'अ' संघाविरुद्ध सराव करत होता. सरावाच्या पहिल्या दिवशी (शुक्रवारी) फलंदाजीदरम्यान राहुलच्या उजव्या कोपराला दुखापत झाली होती. वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाचा उसळी घेतलेला चेंडू राहुलच्या कोपरावर आदळला. फिजिओनी पुढील चाचण्यांसाठी राहुलला मैदानाबाहेर नेले. त्यानंतर शनिवारी तो क्षेत्ररक्षण करण्यासाठी मैदानात उतरला नाही. मात्र, त्याची दुखापत गंभीर नसून केवळ खबरदारी बाळगली जात असल्याचे म्हटले जात होते. रविवारी राहुलने बुमरा आणि रविचंद्रन अश्विन यांसारख्या भारताच्या प्रमुख गोलंदाजांचा नेट्समध्ये सामना केल्याने भारतीय संघाची चिंता दूर झाली आहे.



तीन वेगवान गोलंदाज संघाबरोबर

भारत 'अ' संघाचा भाग असणाऱ्या मुकेश कुमार, खलील अहमद आणि नवदीप सैनी या वेगवान गोलंदाजांनाही ऑस्ट्रेलियात थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे तिघे नेट्समध्ये गोलंदाजी करणे अपेक्षित आहे. तसेच मुख्य संघातील गोलंदाजाला दुखापत झाल्यास त्यांना संधी मिळू शकेल. सैनीला ऑस्ट्रेलियात कसोटी सामने खेळण्याचा अनुभव आहे. तो गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात सिडनी आणि ब्रिस्बेन येथील सामने खेळला होता.

पडिक्कलला ऑस्ट्रेलियात थांबविण्याचा निर्णय

- **गिलची दुखापत, तसेच रोहितच्या उपलब्धतेबाबत संभ्रम या पार्श्वभूमीवर, भारतीय संघ व्यवस्थापनाने आघाडीच्या फळीतील फलंदाज देवदत्त पडिक्कलला ऑस्ट्रेलियातच थांबविण्याचा निर्णय घेतला आहे.**
- **ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारत 'अ' संघात पडिक्कलचा समावेश होता. ऑस्ट्रेलिया 'अ' संघाविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांत त्याने अनुक्रमे ३६, ८८, २६, १ अशा धावा केल्या. आता राखीव खेळाडू म्हणून त्याला ऑस्ट्रेलियात थांबावे लागणार आहे.**
- **"पडिक्कलला आता ऑस्ट्रेलियात खेळण्याचा अनुभव आला आहे. तेथील परिस्थिती आणि खेळपट्ट्यांची त्याला ओळख झाली आहे. तसेच सरावादरम्यान तो बुमराविरुद्ध सहजपणे खेळताना दिसला. या सर्व गोष्टींचा विचार करण्याचा आला," असे सूत्रांकडून सांगण्यात आले.**
- **पडिक्कलने याच वर्षी धरमशाला येथे इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण केले होते. यात त्याने चौथ्या क्रमांकावर खेळताना ६५ धावा केल्या होत्या. पडिक्कलमध्ये सलामीसह मधल्या फळीत खेळण्याची क्षमता आहे. याचा भारताला फायदा होऊ शकेल.**

भारतीय संघाचे रविवारी साधारण तीन तास सराव सत्र झाले. यात ३२ वर्षीय राहुलने सहभाग नोंदवला. त्याने बराच वेळ फलंदाजी केली आणि यादरम्यान त्याला कोणतीही अडचण जाणवली नाही. विशेषतः फिरकीपटूंविरुद्ध तो आक्रमक शैलीत खेळताना दिसला. त्याने क्रीजबाहेर येऊन फटके मारले, तसेच रीव्हर्स स्वीपचाही वापर केला. बुमराविरुद्ध अधिक सावधपणे खेळताना दिसला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) याची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केली.

''सराव सामन्याच्या पहिल्या दिवशी मी जायबंदी झालो होतो. मात्र, आता मी ठीक असून पहिल्या कसोटीच्या तयारीला लागलो आहे. मैदानावर उतरून येथील परिस्थितीशी जुळवून घेण्याची संधी मिळाली याचा आनंद आहे,'' असे 'बीसीसीआय'ने प्रसिद्ध केलेल्या चित्रफितीत राहुल म्हणाला.

तसेच आम्ही केलेल्या उपचारांना राहुलने सकारात्मक प्रतिसाद दिला, असे भारतीय संघाचे फिजिओ कमलेश जैन यांच्याकडून सांगण्यात आले. ''राहुलच्या कोपराला फ्रॅक्चर तर नाही ना, हे आम्ही सर्वप्रथम पाहिले. त्याला दुखापत झाली, याला आता ४८ तास होऊन गेले आहेत. आम्ही केलेल्या उपचारांना त्याने चांगला प्रतिसाद दिला. तो आता कोणत्याही अडचणीविना खेळण्यास सज्ज आहे,'' असे कमलेश म्हणाले.

रोहित अनुपलब्ध

राहुल मैदानात पतरल्याने भारतीय संघ व्यवस्थापनाला मोठा दिलासा मिळाला आहे. डाव्या हाताच्या अंगठ्याला फ्रॅक्चर असल्याने शुभमन गिल पहिल्या कसोटीला मुकण्याची शक्यता असून कर्णधार रोहितही उपलब्ध असणार नाही, अशी माहिती मिळत आहे. रोहितच्या पत्नीने शुक्रवारी त्यांच्या दुसऱ्या पाल्याला जन्म दिला. मात्र, तो थेट ॲडलेडमध्येच भारतीय संघात दाखल होईल असे समजते. बॉर्डर-गावस्कर करंडक मालिकेतील दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून ॲडलेड येथे खेळवला जाणार आहे.

आजचा दिवस विश्रांतीचा

गेले तीन दिवस 'वॅका' स्टेडियमवर कसून सराव केल्यानंतर भारतीय संघासाठी आज, सोमवारचा दिवस विश्रांतीचा असेल. त्यानंतर मंगळवारपासून भारतीय संघ पर्थच्याच 'ऑप्टस स्टेडियम'वर सरावाला सुरुवात करेल. याच मैदानावर शुक्रवारपासून (२२ नोव्हेंबर) बॉर्डर-गावस्कर करंडक मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळवला जाणार आहे.

महिला हॉकी संघाची जपानवरही सरशी

अव्वल क्रमांकाने उपांत्य फेरीत; दीपिकाची चमक

वृत्तसंस्था, राजगीर (बिहार)

भारतीय महिला संघाने आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेतील आपले जेतेपद टिकविण्याच्या दिशेने आणखी एक भक्कम पाऊल टाकले. साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात रविवारी जपानवर ३-० असा विजय मिळवून भारतीय संघाने अव्वल क्रमांकासह उपांत्य फेरीत प्रवेश केला.

स्पर्धेत कमालीची लय राखून असलेली दीपिकाच या सामन्यातही भारताच्या विजयाची शिल्पकार ठरली. उत्तरार्धात ३७व्या मिनिटाला नवनीत कौरने गोल केल्यानंतर अखेरच्या टप्प्यात दीपिकाने पेनल्टी कॉर्नरवर दोन गोल करून भारताचा आणखी एक विजय साकार केला. अन्य सामन्यात मलेशियाने थायलंडचा आणि चीनने दक्षिण कोरियाचा २-० अशाच फरकाने पराभव केला.

भारताची दीपिका या स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारी खेळाडू ठरली आहे. पेनल्टी कॉर्नरवर पाच, मैदानी चार आणि पेनल्टी स्ट्रोकवर एक असे दहा गोल दीपिकाच्या नावावर आहेत.

भारताने सामन्याला नेहमीप्रमाणे वेगवान

सुरुवात केली. आठव्याच मिनिटाला लागोपाठ मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर दीपिकाचे गोल करण्याचे प्रयत्न जपानची गोलरक्षक यू कुडोने फोल ठरवले. त्यानंतरही भारतीय खेळाडूंनी वेगवान आक्रमणे करून सातत्याने कॉर्नर मिळवले. मात्र, प्रत्येक वेळेस गोलरक्षक कुडोने भारतीय खेळाडूंना निराश केले. उत्तरार्धातही कुडो भारतीय खेळाडूंच्या समोर भक्कमपणे उभी होती. मात्र, सामन्याच्या ३७व्या मिनिटाला नवनीतने मैदानी गोल करून अखेर भारताचे खाते उघडले. त्यानंतर ४७व्या मिनिटाला मिळालेल्या कॉर्नरवर दीपिकाने मैदानालगत जोरकस फटका मारून भारताचा दुसरा गोल केला. पुढच्याच मिनिटाला आणखी एका कॉर्नरवर दीपिकाने पुन्हा चेंडूला जाळीची दिशा दिली.

मॅग्नस कार्लसनचेच वर्चस्व

कोलकाता : मॅग्नस कार्लसनने विश्वातील अव्वल बुद्धिबळपटू म्हणून आपला लौकिक पुन्हा सिद्ध करताना प्रतिष्ठेच्या टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत जलदपाठोपाठ अतिजलद प्रकारातही जेतेपद पटकावले. कार्लसनने या स्पर्धेत दुसऱ्यांदा दुहेरी मुकुट मिळवला. त्याने २०१९ मध्येही अशी कामगिरी केली होती.

अतिजलद प्रकारात पहिल्या दिवशी (शनिवारी) कार्लसनला भारताच्या अर्जुन एरिगेसीकडून पराभव पत्करावा लागला होता. एरिगेसीने अवघ्या २० चालींत कार्लसनला नमवले होते. मात्र, कार्लसनने या पराभवाची परतफेड रविवारी केली. त्याने १७व्या फेरीत एरिगेसीला पराभूत करत स्पर्धेत विजयी आघाडी मिळवली. मग अखेरच्या १८व्या फेरीत भारताच्या विदित गुजराथीवर मात करत कार्लसन एकूण १३ गुणांसह अतिजलद प्रकारात विजेता ठरला.

महिलांत, अतिजलद प्रकारातील तीन वेळच्या विश्वविजेत्या कॅटेरिना लायनोने बाजी मारली. लायनोने ११.५ गुणांसह अग्रस्थान पटकावले.

व्हीएसजे इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लि.
जी-12, तळमजला, रहेजा सेंटर, 214 फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - 400021.

अचल मालमत्तेच्या विक्रीकरीता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 8 (6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सरफेसि ॲक्ट) अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, कॉर्पोरेट जामीनदार आणि वैयक्तिक जामीनदारांना सूचित करण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली अचल मालमत्ता व्हीएसजे इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड ("सुरक्षित कर्जदार") कडे तारण / भाग्रस्त असून, कर्जदार आणि / किवा जामीनदारांकडून देय रकमेची वसुली (त्याचा तपशील खालील तक्त्यामध्ये आहे) यासाठी सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ?सेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ?क्ट, 2002 अंतर्गत, या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे. सुरक्षित धनको / व्हीएसजे इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लि. यांना देय असलेल्या रक्कम रु. 114,87,41,795 दि. 11 नोव्हेंबर 2024 रोजी नुसार अधिक व्याज आणि इतर शुल्क (वसुली असल्यास वजा करून) या रकमेच्या वसुलीसाठी खाली वर्णन केल्याप्रमाणे सांकेतिक ताब्यात असलेल्या खालील अचल मालमत्तेच्या खरेदीसाठी "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि " उपाय नाही" तत्त्वावर दि. 24 डिसेंबर 2024 रोजी अधोस्वाक्षरीकारा द्वारे ऑफर आमंत्रित केल्या आहेत. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खाली टेबलमध्ये मालमत्तेच्या वर्णनासह दर्शविण्यात आले आहे. बयाणा रक्कम दि. 23 डिसेंबर 2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजता किंवा त्यापूर्वी (ऑनलाइन किंवा ऑफलाइन) जमा करण्यात यावे.

कर्जदार आणि जामीनदारांचे नाव आणि पत्ता :

1. **मे. भारत महान डेव्हलपर्स अँड बिल्डर्स (कर्जदार)**
   पत्ता :- तळमजला, एस.जी. भरवे मार्ग, अली दादा इस्टेट, कुर्ला (पूर्व), मुंबई - 400024.
   ई-मेल : bharatmahandevelopers@gmail.com
2. **श्री. यशवंत पाटील (सह-कर्जदार)**
   पत्ता :- फ्लॅट क्रमांक 403/4, सी वुड्स एल स्टेट फेज 1, से. 54, 56 आणि 58, ओआयटी पाम बीच रोड, नेरुळ, नवी मुंबई 400 706. ई-मेल : yeshwantvpatil@yahoo.com
3. **श्री. बाळासाहेब काशिनाथ शिंदे (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ता :- फ्लॅट क्र. 1, अनिल अपार्टमेंट, 3, एस. क्र. 80/2, बॅनर रेसिडेन्सी, बाणेर रोड, औंध, पुणे 411007. ई-मेल : bk.shinde@yahoo.co.in
4. **श्री. नंदकुमार मलकू पाटील (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ता :- फ्लॅट क्रमांक 17, इमारत. क्र. 18/बी, रविकिरण अपार्टमेंट, सकलनगर, बाणेर, पुणे 41107. ई-मेल : nmpatil11@gmail.com
5. **सौ. अनामिका अमर जाधव (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ताः फ्लॅट क्र. 56/1502, इमारत क्र. 48 सी वुड्स इस्टेट, फेज II, सेक्टर क्र. 54, 56 आणि 58, पाम बीच रोड, नेरुळ, नवी मुंबई 400 706. ई-मेलः anamikajadhav.7@gmail.com
6. **श्री. अयुब अली खान (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ता :- ए-1/2, श्री शंकर मंदिर, अली दादा इस्टेट, एस जी बर्वे मार्ग, कुर्ला पूर्व, मुंबई 400024
7. **श्री. मोहम्मद सलीम अब्दुल खान (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ता :- राजाबी, घर क्रमांक 10, पहिला मजला, खोली क्रमांक 05 जंजीकर स्ट्रीट, मुंबई-400003
8. **श्री. श्रीकांत दिगंबर शितोळे (वैयक्तिक जामीनदार)**
   पत्ता :- 3रे व्हायलेट अपार्टमेंट, सिंधी गेट, मुरबाड रोड, कल्याण ठाणे, महाराष्ट्र, 421301. ई-मेल : shrikantdshitole@gmail.com
9. **मे. इनोव्हेटिव्ह ?ग्रो इस्टेट प्रा. लि. (कॉर्पोरेट जामीनदार)**
   पत्ता :- 105, पहिला मजला, स्प्रिंग अव्हेन्यू, एस. क्र. 61, हिसा क्र. 61/पी, क्लब रोड, खाकडपाडा, कल्याण पश्चिम - 421301. ई-मेल : direct@innovativegroups.in
10. **मे. विश्व डेव्हलपर्स (कॉर्पोरेट जामीनदार)**
    पत्ता :- दुकान क्र. 3, ऑर्किड मेट्रोपोलिसेस, एस. जी. बर्वे मार्ग, अली दादा इस्टेट, कुर्ला (पूर्व), मुंबई - 411024. ई-मेल : chetan_kadam01@yahoo.co.in

ज्ञात भार, असल्यास यांसह अचल मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन.

अ. क्र.	अचल मालमत्तेचे तपशील	राखीव किंमत (भा. रु. मध्ये)	बयाणा रक्कम (भा. रु. मध्ये)
1	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 16, पार्किंग मजल्यावरील, इमारत. क्र. 18, विंग - बी, "रविकिरण", सकलनगर आर को-ऑप. हाऊसिंग सोसा. लि., सीटीएस क्र. 1620, 1621, एस. क्र. 82 ए (1), 83 ए (1), लागू बंधू ज्वेलर्सजवळ, औंध, पुणे, मोजमाप 977 चौ. फूट, सोबत 10 चौ. मी. कव्हर कार पार्किंगसह, तसेच त्यावरील वर्तमान आणि भविष्यातील न विकलेल्या बांधकामासह त्यावरील सामाईक क्षेत्रामध्ये अविभाजित वाटा आणि सुविधा वापरण्याचा अधिकार.	80,00,000	8,00,000
2	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 17, पार्किंग स्टील्ट मजल्यावरील, इमारत. क्र. 18, विंग - बी, "रविकिरण", सकलनगर आर को-ऑप. हाऊसिंग सोसा. लि., सीटीएस क्र. 1620, 1621, एस. क्र. 82 ए (1), 83 ए (1), लागू बंधू ज्वेलर्सजवळ, औंध, पुणे, मोजमाप 971 चौ.फूट, सोबत त्यावरील वर्तमान आणि भविष्यातील न विकलेल्या बांधकामासह त्यावरील सामाईक क्षेत्रामध्ये अविभाजित वाटा आणि सुविधा वापरण्याचा अधिकार.	80,00,000	8,00,000
3	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 103, पहिला मजला, बी बिल्डिंग. "विंडसर रेसिडेन्सी"; एस. क्र. 135/1, बालेवाडी फाट्याजवळ, गाव बाणेर, पुणे, मोजमाप 857 चौ. फू. डोन्ट पार्किंग जागा क्र. 103 मोजमाप 100 चौरस फूट यासह, सोबत त्यावरील वर्तमान आणि भविष्यातील न विकलेल्या बांधकामासह.	1,40,00,000	14,00,000

सुरक्षित धनको, जनकल्याण सहकारी बँक लि., चेंबूर (मुंबई) च्या माहितीनुसार, ते त्यांच्या कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदारांविरुद्ध सुरू केलेल्या वसुलीच्या कार्यवाहीच्या संबंधात वर नमूद केलेल्या मालमत्तेवर भार करण्याचा दावा करत आहे आणि पुढे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1961 च्या तरतुदीनुसार उपनिबंधक, सहकारी संस्थांनी जारी केलेले वसुली प्रमाणपत्र असल्याचाही दावा करत आहे. तथापि, सुरक्षित धनको अशा कोणत्याही कथित दाव्यासाठी आणि मालमत्तेवरील पूर्व भार यासाठी गोपनीय नाही. जनकल्याण सहकारी बँक लि. ने आरोप केलेले / दावे केलेले असे कोणतेही भार यासंदर्भात लिलाव बोलीदार / संभाव्य खरेदीदारा यांनी पडताळणी करणे आवश्यक आहे. सुरक्षित धनकोला इतर कोणत्याही भाराची माहिती नाही, आणि त्याच्या संबंधात त्यांच्यावर कोणतेही बंधन नाही.

अस्वीकरण : केलेल्या मूल्यांकनाच्या अधीन नमूद केलेले क्षेत्र.

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना विनंती करण्यात येत आहे कि, त्यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी वापरून पोर्टलवर नोंदणी करावी. पुढे, त्यांना अशीही विनंती करण्यात येत आहे कि, त्यांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे अपलोड करावीत.

सुरक्षित मालमत्तेच्या पाहणीची तारीख	27 नोव्हेंबर 2024 ते 28 नोव्हेंबर 2024 पर्यंत दुपारी 12 ते 4 वा. दरम्यान
बोली सादर करण्याची शेवटची तारीख	23 डिसेंबर 2024 रोजी सायंकाळी 5.00 वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी.
ई-लिलाव पोर्टल / हेल्पडेस्क	https://sarfaesi.auctiontiger.net; 9265562818 / 9265562821 / 079-6813 6842 / 6869
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	24 डिसेंबर 2024 रोजी दुपारी 01:00 ते सायंकाळी 5:00 वाजता प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्याद विस्तारांसह

ई-लिलाव आणि विक्रीच्या अटी व शर्तींच्या अधिक तपशिलांसाठी, कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर दिलेली लिंक म्हणजे https://vsjinvestments.com/legal; https://sarfaesi.auctiontiger.net; ops@vsjinvestments.com चा संदर्भ घ्या, पवन छंगानी - 02267155228

दिनांक : 15.11.2024 **स्वा/-**
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी**

Format C-1
Declaration about criminal cases

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and Address of the Candidate : **Vinod vasant chandgude GAT NO 181183 PHASE II FLAT NO D 401 DIN GRAJWADI SHIRUR PUNE Dingrajwadi 412208**
Name of Political Party : **Maharashtra Swarajya Party**
Name of Election : **Assembly Election of Maharashtra**
***Name of Constituency** : **198- Shirur Vidhansabha.**

I, Chandgude Vinod Vasant (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

Sl. No.	Name of Court	Case No. and dated	Status of case(s)	Section(s) of Acts concerned and brief description of offence(s)	Maximum Punishment Imposed
1	Pimpari Court Pune	424/2016, Wakad Police Station, Pune	Pending	325, 504	Not Applicable
2	Details of cases of conviction for criminal offences				Not applicable

Name & Singnature of Candidate
Chandgude Vinod Vasant

महाराष्ट्राचा उत्तराखंडवर डावाने दणदणीत विजय

रामनगर : भक्कम फलंदाजीनंतर गोलंदाजांच्या अचूक कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्राने सी. के. नायडू करंडक क्रिकेट स्पर्धेत रविवारी, सामन्याच्या तिसऱ्याच दिवशी उत्तराखंडचा १ डाव आणि १४३ धावांनी दणदणीत पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना ४२९ धावांचा डोंगर उभा केल्यावर महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी उत्तराखंडचा पहिला डाव १३३ धावांत गुंडाळला. दुसऱ्या दिवसअखेरच्या ९ बाद १३३ धावसंख्येत तिसऱ्या दिवशी उत्तराखंडला एकाही धावेची भर घालता आली नाही. महाराष्ट्राकडून पहिल्या डावात क्षितिज पाटीलने २५ धावांत ६ गडी बाद केले. दुसऱ्या डावात विकी ओस्तवालने ३३ धावांत ५ गडी बाद करत चमक दाखवली.

पहिल्या डावात २९६ धावांची आघाडी घेतल्यावर महाराष्ट्राने उत्तराखंडवर फॉलोऑन लादला. उत्तराखंडचे फलंदाज दुसऱ्या डावातही महाराष्ट्राच्या अचूक गोलंदाजीसमोर टिकू शकले नाहीत. त्यांचा दुसरा डाव ४४.५ षटकांतच १५३ धावांत आटोपला. उत्तराखंडकडून पहिल्या डावात सर्वाधिक ३१ धावा करणाऱ्या शाश्वत डंगवालने दुसऱ्या डावात ६० धावांची खेळी केली. शाश्वत वगळता उत्तराखंडच्या अभ्युदय (२७) आणि हर्ष राणा (१४), सत्यम बालियान (१२) यांनाच दोन आकडी मजल मारता आली.

संक्षिप्त धावफलक

- **महाराष्ट्र (पहिला डाव) : ४२९**
- **उत्तराखंड (पहिला डाव) : १३३ (शाश्वत डंगवाल ३१; क्षितीज पाटील ६/२५)**
- **उत्तराखंड (दुसरा डाव) : सर्वबाद १५३ (शाश्वत डंगवाल ६०, अभ्युदर २७; विकी ओस्तवाल ५/३३, राज्यवर्धन हंगर्गेकर २/५०)**

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

मॅरेज ब्युरो

सौ. कुळकर्णी विवाह संस्थेत आजच नाव नोंदवा. उद्योजक, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, CA, MBA, NRI, बँकर्स सर्व जातींच्या वधू-वरांची हजारो स्थळे. ।। पवित्र विवाह।। 8450914835/ 8369692734/ 9892625606.
0070934850-1

जाहिरातविषयक

HIGHTECH, EXPERTS, QUICK SERVICE (SARVODAYA ADVERTISING) लोकसत्ता+सर्वच वर्तमानपत्रात स्कीम+डिस्काउंट विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या जाहिराती प्रसिद्धीसाठी. 9321989026/ 9322277986
0070927125-1

नावात बदल

I, Shobhatai spouse of No 13970605P Ex Nk Patil Bhanudas Baburao have changed my name from Shobhatai to Shobhatai Bhanudas Patil vide affidavit No 1520/2024 dated 14/11/2024.
0090363585-3

I Shinde Nana bhanudas Father of Army No 15587605K Rank N k shinde vijay Nanasaheb I Have changed My name shinde Nanasaheb bhanudas to Nana bhanudas shinde & DOB 01/01/1957 to 01/01/1956 vide Affidavit No . 4406/2024 dt - 28 sep 2024 .
0050254675-1

I JC-732490Y Sub Pushpendra Singh have changed my daughter name from Anjali to Anjali Singh vide affidavit-956/24 dated-16/11/2024
0090363612-1

I Pandit Father of No . 15580864K Rank N k Name Bangar Motilal Pandit I Have Changed My Name Pandit to pandit Bhagwan Bangar and DOB 01/01/1960 to 01/01/1959 Aff No . 2202/24 Dt 06 Sep 2024 .
0050254674-1

I Indubai Mother Of No 15587605 K Rank N K shinde vijay Nanasaheb I Have changed My Name Indubai to Indubai Nana Shinde & DOB 02/05/1967 to 01/01/1967 vide Affidavit No . 4407/2024 dt 28 Sep 2024 .
0050254676-1

I, Julekha Begum spouse of No 1573196A Ex Nk Ali Mohamad Bashir Sheikh have changed my name from Julekha Begum to Julekha Begam Alimohmad Shaikh & DOB from 26/01/1973 to 01/01/1969 vide affidavit No 1518/2024 dated 14/11/2024.
0090363585-4

I , Manik Karbhari Kuwar Father of No . 15582529Y Rank Hav Name Kuwar Chetan Manik I Have Changed My DOB 01/07/1962 to 01/06/ 1962 Affidavit No 451/2024 Dt 13 Nov 2024 .
0050254668-1

I , Kamal Narayan Gangarde Mother of No . 15575441M Rank Hav Name Gangarde Arun Narayan I Have Changed My DOB 25 Jan 1965 to 01 Jun 1965 Affi No . 134/24 Dt 14 Nov 2024 .
0050254670-1

I , Bangar Barkibai Pandit Mother of No . 15580864 K Rank Nk Name Bangar Motilal Pandit I Have Changed My Name Bangar Barkibai Pandit to Bangar Barkabai Pandit and DOB 01/02/1967 to 18/08/1967 Aff No 2201/24 Dt 06 Sep 2024 .
0050254673-1

My old name Baishakhi pal Chaudhary Changed to new name as Baishakhi Pal As per relevant Documents
0090363595-1

I am changing my name from Mallappa to Mallappa Peerappa Markunda for passport issuance.
0090363618-1

I, Vijiya widow of No 1536189M Ex Sep Sadashiv Katkar have changed my name from Vijiya to Vijaya Sadashiv Katkar & DOB is 01/01/1958 vide affidavit No 1521/2024 dated 14/11/2024.
0090363585-2

I, Sumanti spouse of JC-108210K Ex Sub (Hony Capt) Jagannath Surve have changed my name from Sumanti to Sumanti Jagannath Surve vide affidavit No 1514/2024 dated 14/11/2024.
0090363584-2

I , Narayan Ramchandra Gangarde Father of No . 15575441M Rank Hav Name Gangarde Arun Narayan I Have Changed My DOB 25 Jan 1959 to 01 Jun 1958 Affi No . 135/24 Dt 14 Nov 2024 .
0050254669-1

I, Rekha Bhyi spouse of No 15351129F Ex Hav Patil Gokul Daga have changed my name from Rekha Bhyi to Rekha Gokul Patil vide affidavit No 1516/2024 dated 14/11/2024.
0090363585-6

I have Changed my name Amit Kishore Baldota to New name Amit Kishor Baldota as per document
0090363618-2

I, R Kasturi widow of JC-218614P Ex Sub Rasineni Radhakrishnaiah Naidu have changed my name from R Kasturi to Kasturi Rasineni Naidu & DOB from 02/02/1955 to 01/01/1956 vide affidavit No 1519/2024 dated 14/11/2024.
0090363585-1

I, No 14614683X Ex Hav Kshir Sagar Dinesh Chandrakant have changed my name from Kshir Sagar Dinesh Chandrakant to Kshirsagar Dinesh Chandrakant vide affidavit No 1513/2024 dated 14/11/2024.
0090363584-3

I, No 13911268N Ex Nk Waghmare Popat Nemdeo have changed my name from Waghmare Popat Nemdeo to Popat Namdeo Waghmare vide affidavit No 1511/2024 dated 14/11/2024.
0090363584-5

I, Manisha Dinesh spouse of No 14614683X Ex Hav Kshir Sagar Dinesh Chandrakant have changed my name from Manisha Dinesh to Manisha Dinesh Kshirsagar vide affidavit No 1512/2024 dated 14/11/2024.
0090363584-4

I, Kalpna spouse of JC-412144H Ex Sub (Hony Lt) Pawar Shamrao Babu have changed my name from Kalpna to Kalpana Shyamrao Pawar & DOB from 02/07/1963 to 01/06/1964 vide affidavit No 1515/2024 dated 14/11/2024.
0090363584-1

I, Kalatai spouse of No 2787908H Ex Nk Khot Ashok Ananda have changed my name from Kalatai to Kalatai Ashok Khot v